**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे



या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!

इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.

- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75



वर्ष ५ । अंक १८० । शनिवार ४ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २  https://epaper.dainkaakarshan.com  E-mail- dainikaakarshan@gmail.com  RNI NO. MAHMAR/2021/84322


# सोलर केबल चोरणारे चार सराईत जेरबंद

## एलसीबीच्या कारवाईत दहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**पथकात यांचा सहभाग**

**सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, संदीप मुरकुटे, अंमलदार विष्णू भागवत, अतुल लोटके, फुरकान शेख, रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक अरुण मोरे यांनी केली.**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई शिवारात सोलर केबलची चोरी करणा–या रेकॉर्डवरील चार आरोपींना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे. या कारवाईत एकूण सुमारे दहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, तीन गुन्ह्यांची उकल झाली आहे.

संतोष अशोक जाधव (वय–२८, रा. हायस्कुल जवळ प्रवरासंगम ता.नेवासा), करण वैश्य भोसले (वय– २०, रा. भेंडाळा ता.गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर), मनोज सुनील लिंभोरे (वय– २३, रा. कहारगल्ली, प्रवरासंगम ता.नेवासा) व परमेश्वर वैश्य भोसले (वय– ३९, रा. भेंडाळा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

**अशोक जाधववर दहा, तर परमेश्वर भोसलेवर सात गुन्हे**

**आरोपी अशोक जाधव हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर नगर जिल्ह्यातील चार गुन्ह्यांसह एकूण दहा गुन्हे दाखल आहेत. आरोपी परमेश्वर वैश्य भोसले याच्यावर अहिल्यानगर, जळगाव व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये दरोडा, दरोडा तयारी, घरफोडी, चोरी असे एकूण सात गुन्हे दाखल आहेत.**

जेऊर बायजाबाईचे येथील सोलार कंपनी एव्हीएएडीए एमएसकैव्ही टेन्थ सोलर एसपीव्ही लिमिटेड या कंपनीचे घुरवडी डोंगरावर असलेले ६५०० मीटर केबल, १५०० डीसी सोलर केबल व ४ एमएम कॉपर तार असलेली केबल कोणीतरी अज्ञात चोरट्याने १८ व १९ मार्च यादरम्यान चोरून नेली होती. या प्रकरणी सोमनाथकाशिनाथ तोडमल (वय ३७, रा. जेऊर बायजाबाई ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

एलसीबीचे पथक या गुन्ह्याचा तपास करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, हा गुन्हा रेकार्डवरील आरोपी संतोष अशोक जाधव (रा. प्रवरासंगम ता. नेवासा) याने साथीदारांसह केला असून, तो सध्या शेंडी बायपास रोडने पांढ–या रंगाच्या पिकअप व मोटारसायकलवर केबलची विक्री ■ पान ४ वर

**अवैध वेश्याव्यवसाय चालविल्या प्रकरणी प्रशासनाची कारवाई**

# भैय्या गोरे, अक्षय कर्डिले यांचे लॉज एक वर्षासाठी बंद करण्याचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील रूईछत्तीशी आणि खंडाळा परिसरात वेश्या व्यवसाय चालविल्या प्रकरणी भैय्या उर्फ गणेश संपत गोरे याचा साई लॉज व अक्षय अनिल कर्डिले याचा राजयोग लॉज पुढील एक वर्षासाठी पूर्णपणे बंद करण्याचा आदेश प्रशासनाने दिले आहेत. हे दोन्ही लॉज वेश्या व्यवसायासाठी कुप्रसिद्ध झाले होते.

उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी हा आदेश काढला असून, या कारवाईचे परिसरातील ग्रामस्थांमधून स्वागत होत आहे.

परिसरात वाढत चाललेल्या अनैतिक प्रकारांमुळे परिसरातील ग्रामस्थांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. याविरोधात संतप्त होत ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन आणि उपोषण सुरू केले होते. नागरिकांच्या वाढत्या रोषाची दखल घेत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या परिसरात भेट देऊन ग्रामस्थांना कारवाईचे आश्वासन दिले होते.

यानंतर तालुका पोलिसांनी केलेल्या तपासात या ठिकाणी सातत्याने वेश्याव्यवसाय चालविला जात असल्याचे निष्पन्न झाले व त्यानुसार गुन्हे नोंदवण्यात आले. पोलिसांनी पाठवलेल्या प्रस्तावानुसार साई लॉजचा मालक भैय्या उर्फ गणेश संपत गोरे व राजयोग लॉजचा मालक अक्षय अनिल कर्डिले यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. परंतु लॉजमालकांनी दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने सार्वजनिक नीतिमत्ता राखण्यासाठी हे दोन्ही लॉज सील करण्यात आले आहेत. वेश्या ■ पान ४ वर

# कर्करोग रुग्णांसाठी ठोस उपाययोजना करा

## खासदार नीलेश लंके यांची लोकसभेत मागणी ।प्रत्येक तालुक्यात उपचार केंद्र उभारा । अहिल्यानगर जिल्ह्यातील रुग्णांची व्यथा संसदेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** खासदार नीलेश लंके यांनी लोकसभेमध्ये कर्करोग रुग्णांच्या गंभीर समस्यांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले. ग्रामीण भागातील रुग्णांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागत असल्याची वस्तुस्थिती त्यांनी अधोरेखित केली.

महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या अहिल्यानगर जिल्ह्याचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, येथील गरीब कर्करोग रुग्णांना केमोथेरपीसाठी वारंवार मुंबई आणि पुणे येथील रुग्णालयांमध्ये जावे लागते. यामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांवर मोठा आर्थिक व मानसिक ताण येत आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना कर्करोगाच्या उपचारासाठी शेतजमीन, दागदागिने व मालमत्ता विकावी लागत असल्याचे वास्तव त्यांनी संसदेत मांडले. ''ही परिस्थिती केवळ आरोग्य व्यवस्थेचे अपयश नसून सरकारच्या संवेदनशीलतेची कसोटी आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. ■ पान ४ वर

**अहिल्यानगर शहरासाठी**

# प्रगतीचे व्हिजन असणे अत्यंत महत्त्वाचे - उपमहापौर धनंजय जाधव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेत सर्वानुमते उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना जाधव यांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी सदैव तत्पर असून पुढील काही वर्षाचे व्हिजन समोर ठेवून आम्ही सर्वजण काम करणार आहोत. शहराचा विकास हा एकमेव हेतू डोळ्यासमोर ठेवून शहरवासीयांच्या प्राथमिक गरजांसोबत शहरात तरुणांना समोर ठेवून नाविन्यपूर्ण उद्योग आणि उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे सांगितले. सर्वांना सोबत घेऊन केवळ नगर विकास हाच एक ध्यास मनाशी बाळगून हे पद स्वीकारल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

या प्रसंगी त्यांनी विद्यालयाच्या कम्प्युटर लॅब ला भेट दिली. नव्याने नूतनीकरण करून सुरू करण्यात आलेल्या कम्प्युटर लॅबचे आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे पाहताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी ए आय हे भविष्य असून, शिक्षण क्षेत्रात ए. आय. चा उपयोग अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. यासाठी शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणामुळे त्यांचे करिअर आणि भविष्य हे नक्कीच उज्वल असेल असे प्रतिपादन केले.

स्कूल कमिटीचे चेअरमन ■ पान ४ वर

# अंजली दमानिया रॉ एजंट आहेत का?

## अशोक खरात प्रकरणावरून संजय राऊत यांचा निशाणा

**मुंबई । वृत्तसंस्था –** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरुन राजकीय आरोप–प्रत्यारोपही सुरू असताना सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अशोक खरातचे सीडीआर समोर आणले असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेतही त्यांचा अनेक कॉल झाल्याची माहिती दमानिया यांनी दिली. त्यासंदर्भाने शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत



यांनी प्रतिक्रिया देताना, अंजली दमानिया यांच्यावरच सवाल उपस्थित केला आहे. अंजली दमानिया काय रॉ एजंट आहेत का? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला. तसेच, सरकारच्या निशाण्यावर स्वकीयच आहेत, असे म्हणत नाव न घेता एकनाथ शिंदेंनाही लक्ष्य केले.

अशोक खरात प्रकरणात सामाजिक ■ पान ४ वर




## दै. आकर्षण निवडक

### बाल हनुमान हर्षद आनेचा यांनी नगरकराना केले मंत्रमुग्ध

अहिल्यानगर - हर्षद योगेश आनेचा हे बाल



हनुमान म्हणून नगर शहराला परीचीत आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून बाल कलाकार हर्षद आनेचा हे हनुमानाची आकर्षक अशी वेशभूषा करून श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)श्रीराम मंदिर नवीपेठ येथील हनुमान चालीसा मंडळामध्ये बाल हनुमान म्हणून सेवा देत आहेत.रामजी की निकली सवारी, सुनते ही राम नाम नाचे हनुमान, दुनिया चले न श्रीराम के बिना,अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान अशा अनेक भजनांवर नृत्याची सेवा देतात . हनुमान चालिसा वर नृत्य हे सर्वांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले या संगीतमय भजनांवर नृत्य करून बाल हनुमान हर्षद आनेचा यांनी सर्व नगरकरांना मंत्रमुग्ध केले आहे. दरवर्षी अहिल्यानगर येथे ३१ दिवस होणाऱ्या सामुहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमात बाल हनुमान हर्षद योगेश आनेचा उपस्थित असतात. हर्षद आनेचा यांना मंडळाचे अध्यक्ष प्रितम मुथा, उपाध्यक्ष निखिल शेटीया, मंडळाचे जेष्ठ सदस्य अशोक खंडेलवाल , वडील योगेश आनेचा व आई सौ. नंदा आनेचा यांच्याकडून प्रेरणा मिळाली आहे.त्यामुळे बाल हनुमान हर्षद आनेचा यांच्यावर बाल वयापासूनच धार्मिक संस्कार झालेले आहेत. अहिल्यानगर शहरामध्ये बाल हनुमान हर्षद योगेश आनेचा आणि श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट यांचा डंका वाजत आहे.

### ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रतिभा खैरनार यांची निवड

अहिल्यानगर- छत्रपती संभाजी महाराज,



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी महिला साहित्यिक प्रतिभा खैरनार यांची निवड करण्यात आली. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे रविवार, दि. १७ मे रोजी होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर नुकतीच संयोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत खैरनार यांची निवड करण्यात आली. या बैठकीसाठी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे, गणराज प्रकाशनचे प्रा. गणेश भगत, कवयित्री सरोज आल्हाट, बाळासाहेब देशमुख, भाऊसाहेब कदम, कवी गीताराम नरवडे, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, निवृत्ती महाराज कानवडे, राजेंद्र घोडके, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, बाळासाहेब मुनतोडे आदी उपस्थित होते. प्रतिभा खैरनार या ता. नांदगाव (जि. नाशिक) येथील साहित्यिका असून, त्यांचे विविध काव्यसंग्रह व कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या काव्यसंग्रह व कथासंग्रहाला विविध पुरस्कार देखील मिळालेले आहेत. साहित्य क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांची या संमेलनाच्या अध्यक्षपदी संयोजन समितीच्या वतीने एकमताने निवड करण्यात आली.या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात राज्यभरातील नवोदित तसेच ज्येष्ठ साहित्यिक सहभागी होणार असून साहित्य क्षेत्रातील विविध विषयांवर विचारमंथन होणार आहे. यावेळी काव्य संमेलनाचेही आयोजन करण्यात आले असून अनेक कवी व कवयित्री आपल्या रचना सादर करणार आहेत.

# नगर जिल्ह्यात काँग्रेसचे ‘संघटन सृजन अभियान’

## मे महिन्यात नव्या पदाधिकाऱ्यांची निवड




**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर जिल्ह्यात व्यापक ‘संघटन सृजन अभियान’ राबविण्यात येत असून हे अभियान १९ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. या अभियानाच्या पार्श्वभूमीवर मे महिन्यात जिल्ह्यात नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती पक्ष निरीक्षक शरद राऊटं यांनी दिली.

या वेळी मुंबईचे निरीक्षक मुजफ्फर हुसेन, शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, माजी जिल्हाध्यक्ष करण ससाणे, शहर ब्लॉक अध्यक्ष फिरोज खान, प्रताप शेळके, संपतराव म्हस्के, उपाध्यक्ष बाळासाहेब भंडारी, अण्णासाहेब डावखर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष मोहसीन शेख यांच्यासह नगर दक्षिण काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शरद राऊटं म्हणाले की, काँग्रेस पक्षाने देशभर संघटन सुदृढ करण्यासाठी ‘संघटन सृजन अभियान’ राबविण्याचा निर्णय घेतला असून त्याची सुरुवात गुजरातमधून करण्यात आली आहे. सध्या या अभियानाचा सातवा टप्पा सुरू असून पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन पक्षाविषयी त्यांची मते जाणून घेतली जात आहेत. कार्यकर्त्यांच्या अपेक्षा, आवश्यक बदल आणि संघटनात्मक सुधारणा यावर थेट चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागावर विशेष भर देत ब्लॉक कमिटी स्तरापर्यंत जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार आहे. राज्यातील निवडणुकांमुळे यापूर्वी हे अभियान राबविता आले नव्हते. मात्र आता २ एप्रिलपासून नगर जिल्ह्यात अभियानाला सुरुवात झाली असून १९ एप्रिलपर्यंत ते सुरू राहणार आहे. पक्ष बळकटीकरण हा या अभियानामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्ह्यातील नव्या पदाधिकाऱ्यांसाठी सहा नावे पक्षश्रेष्ठींना पाठविण्यात येणार असून त्यामध्ये एका महिलेचा समावेश असेल. तसेच एक पद अनुसूचित जमाती (एसटी) व एक इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. अंतिम निर्णयानंतर पक्षाकडून नव्या नियुक्त्या जाहीर केल्या जातील, असेही ते म्हणाले.

राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना राऊटं यांनी भाजपवर टीका करत, ‘‘आज अनेक जण काँग्रेसमधून भाजपमध्ये गेले असले तरी खरी भाजप कोणती हे शोधण्याची वेळ आली आहे,’’ असे म्हटले. मात्र काँग्रेस सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राहुल गांधी यांनी देशभर संघटन उभारणीवर भर दिला होता, त्याच धर्तीवर पुन्हा पक्ष संघटन मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. कन्याकुमारी ते काश्मीर पदयात्रेद्वारे लाखो लोक पक्षाशी जोडले गेले होते. त्याचप्रमाणे या अभियानातून नव्याने पक्षबांधणी केली जाणार असल्याचा विश्वास राऊट यांनी व्यक्त केला.

## अहिल्यानगरमध्ये गोवत्स हभप राधाकृष्णजी महाराज व हभप भास्करगिरी महाराज संत-सद्गुरूंचे आगमन

### प्रवचनाचा लाभ घेण्याची भक्तांना संधी



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील भक्तांसाठी आनंदाची बातमी असून संत आणि सद्गुरूंच्या दर्शनाचा व प्रवचनाचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

गुरुदत्त भक्तीधाम, संत किसनगिरीनगर मंदिर येथे रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता , सद्गुरु भास्करगिरी महाराज तसेच परमपूज्य गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज (जोधपूर) यांचे आगमन होणार आहे.या पवित्र प्रसंगी दोन्ही महात्म्यांच्या दर्शनाचा दुग्धशर्करा योग लाभणार असून, परमपूज्य श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या मधुर वाणीमधून भक्तांना प्रवचनाचा लाभही मिळणार आहे. भक्ती, अध्यात्म आणि सत्संग यांचा संगम अनुभवण्याची ही दुर्मिळ संधी असल्याने परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

तरी सर्व भक्तांनी संत आणि सद्गुरूंच्या दर्शनासाठी व सत्संगासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबा नगर भक्तमंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# वनिता मानकर यांचा छत्रपती शिवाजी महाराज कर्तुत्ववान पुरस्काराने सन्मान



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रायगड येथे ३ एप्रिल रोजी पार पडलेल्या, आई फाउंडेशन रायगड व समृद्धी प्रकाशन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आयोजित राज्यस्तरीय गौरव पुरस्कार सोहळा समारंभामध्ये महिला सक्षमीकरण बचत गट या माध्यमातून व सामाजिक कार्यात नेहमी सहभाग घेऊन कार्य करत असलेल्या अहिल्यानगर येथील दिल्लीगेट जीव्हेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. वनिता गणेश मानकर यांचा छत्रपती शिवाजी महाराज कर्तुत्ववान पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते

त्या बद्दल सौ वनिता यांचे जीव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट, व सर्व स्वकुळ साळी समाज यांचे वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# नवनाथ प्रगट दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण शहरातील जुन्या भागातील प्राचीन नवनाथ गुफा मंदिरात चैत्र कृष्ण द्वितीया या शुभ पर्वावर शनिवारी (दि. ४) नवनाथ प्रगट दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी भाविकांनी नवनाथांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करत जयघोष केला. युवा कार्यकर्ता यश पळसकर यांच्या हस्ते नवनाथांचा अभिषेक करण्यात आला. पुरोहित वसंत पूर्णपात्रे यांच्या मंत्रोच्चारात हा धार्मिक विधी पार पडला.

पैठण येथे नवनाथांनी भूमिगत गुफेत तपसाधना केल्याची लोकभावना असल्याने या ठिकाणी भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येतात. त्यामुळे या गुफा मंदिराचे धार्मिक महत्त्व अधिक अधोरेखित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रतिश मगरे, रुद्राक्ष दाभाडे, बबलू हिंगे, वरूण कामाठी, योगेश भावसार, साहेबराव रोकडे, परमानंद दाभाडे, सुभाष घोडके, मधुकर कुलकर्णी, दीपक मस्के, नाना दाभाडे, दया इनामदार, सुभाष काळे आदींनी परिश्रम घेतले.

दरम्यान, प्राचीन गुफा मंदिर सध्या जीर्ण अवस्थेत असून, त्याच्या जीर्णोद्धाराचे काम खासदार संदीपान भुमरे व आमदार विलास भुमरे यांच्या पुढाकाराने सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन कामाचा वेग वाढवा - महापौर ज्योती गाडे

## | पारिजात चौक ते तपोवन रोड रस्त्याच्या कामाची महापौरांची पाहणी; संथ गतीमुळे नागरिक त्रस्त | अनेक महिन्यांपासून रखडलेले काँक्रिटीकरण; ठेकेदाराला काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील पारिजात चौक, एकविरा चौक ते तपोवन रोड दरम्यान सुरू असलेल्या रस्ता काँक्रिटीकरणाच्या कामाची महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या या कामाच्या संथ गतीमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले असून दळणवळणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

महापौरांनी यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांनी महापालिका प्रशासन व ठेकेदार एजन्सीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. ‘‘काम काही महिन्यांपासून सुरू असून मधल्या काळात ते पूर्णपणे बंद होते. त्यामुळे रोजच्या वाहतुकीसह विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे,’’ असे नागरिकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रशासन व ठेकेदार एजन्सीला कडक सूचना देत रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले. ‘‘नागरिकांचे प्रश्न लक्षात घेऊन कामाचा वेग वाढवावा व दर्जेदार काम करून लवकरात लवकर रस्ता पूर्ण करावा,’’ असे त्यांनी स्पष्ट केले.

काम पूर्ण झाल्यानंतर या भागातील दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल तसेच परिसराला सुशोभीकरणाचे स्वरूप प्राप्त होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी शहर अभियंता मनोज पारखे, नगरसेवक निखिल वारे, ऋग्वेद गंधे तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अहमदनगर पहिली मंडळी (काँग्रीगेशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने गुड फ्रायडे (उत्तम शुक्रवार) निमित्त विशेष भक्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या भक्तीचे सूत्रसंचालन मंडळींचे आचार्य रेव्ह. डॉ. सनी पी. मिसाळ यांनी केले. यावेळी कोल्हापूर चर्च कौन्सिलचे रेव्ह. श्रीकांत बी. पठाणे यांनी प्रार्थना व उपदेश करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मंडळीचे सेक्रेटरी नंद प्रकाश शिंदे, खजिनदार प्रकाश सूर्यवंशी, अमोल काळे, सागर घोडके यांच्यासह विश्वस्त मंडळी व तरुण संघ व ख्रिस्त बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विराट हिंदू संमेलन व भव्य कलश शोभायात्रेचे आयोजन

## रामायणाचार्य ह.भ.प.नवनाथ महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत विराट हिंदू संमेलन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तोफखाना व नालेगाव व कल्याण रोड परिसरातील नागरिकांच्या वतीने शनिवारी ४ एप्रिल रोजी सायं ५-०० वाजता रोजी विराट हिंदू संमेलन व भव्य कलश शोभायात्रेचे आयोजन दिल्लीगेट वेस, शनी मंदिर,अहिल्यानगर या ठिकाणी करण्यात आले आहे.या विराट हिंदू संमेलनामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी रामायणाचार्य,भागवताचार्य ,शिवचरित्र व्याख्याते तथा सद्गुरु नारायणगिरीजी गुरुकुलचे संस्थापक ह.भ.प.नवनाथ महाराज म्हस्के,आशुतोष महादेव देवस्थान चे ह.भ.प.राहुल महाराज दरंदले प्रमुख उपस्थित राहणार आहेत.तर यावेळी प्रमुख वक्ते रा.स्व.संघ धर्म जागरण प्रांत मंडळ सदस्य (प्रांत परियोजना प्रमुख)सुनिल काळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

शोभा यात्रा सायंकाळी पाच वाजता श्री राम मंदिर, नेता सुभाष चौक ते दिल्लीगेट वेस पर्यंत आयोजित करण्यात आली आहे.महिलांनी डोक्यावर कलश घेवून शोभायात्रेत सामील व्हावे. तसेच परिसरातील सर्व नागरिकांनी या हिंदू संमेलनात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.अहिल्यानगर शहरात भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.तरी हिंदू समाजातील प्रत्येक बांधव व भगिनींनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.संमेलनानंतर महाप्रसादाची व्यवस्था केली आहे.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### जिजाऊ ब्रिगेडच्या मुंबई महाअधिवेशनाला आजपासून प्रारंभ



अहिल्यानगर - महिलांचे सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक संगठन असलेल्या जिजाऊ ब्रिगेडचे दि.३ एप्रिल रोजी राज्यस्तरीय महाअधिवेशन छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर, मुंबई (दादर) येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रभरातून हजारो महिला पदाधिकारी सहभागी होणार आहेत. या महाअधिवेशनातील वैचारिक प्रबोधनाचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे यांनी केले आहे. महाअधिवेशन एकूण चार सत्रामध्ये पार पडणार असून या भव्य कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितूताई तावडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा सीमा बोके असणार आहेत. तसेच आमदार मंदाताई म्हात्रे, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील आणि ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर यांचीसुद्धा या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते यांचे मार्गदर्शन लाभणार असून, जिजाऊ ब्रिगेडच्या विशेषांकाचे प्रकाशन होणार आहे. या अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, शिवधर्म संसद सदस्य शिवमती रेखाताई खेडेकर तसेच मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष इंजि. विजय घोगरे, राज्य कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे, प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, जिजाऊ ब्रिगेड महासचिव स्नेहा खेडेकर, आंतरराष्ट्रीय अध्यक्षा मयुरा देशमुख, राष्ट्रीय अध्यक्ष निर्मला पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या अधिवेशनासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्ष अंजली भोसले, मुंबई अध्यक्ष स्मिता देसाई, नवी मुंबई अध्यक्ष भारती पाटील, महासचिव सरिता सोमवंशी, कार्याध्यक्ष मनीषा देसाई, ठाणे जिल्हाध्यक्ष सुनिता पाटील व मुंबईची सर्व टिम अथक परिश्रम घेत आहेत. अधिवेशनाकरिता अहिल्यानगर जिल्ह्यातील मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थित राहण्याचे मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे यांनी म्हंटले आहे.

### रायसोनी ठेवीदारांची नगरमध्ये दि. ६ ला सभा

अहिल्यानगर - शहर व जिल्ह्यातील रायसोनी पतसंस्था, जळगाव या पतसंस्थेत ज्यांनी आपल्या कष्टाचा, श्रमाचा पैसा मुदतठेवीत गुंतवला आहे, परंतू अद्यापही अशा ठेवीदारांना ठेवीचा एकही हप्ता मिळालेला नाही. अथवा अजुनही या ठेवी या पतसंस्थेत शिल्लक आहेत, अशा सर्व ठेवीदारांची सभा येत्या सोमवारी (दि. ६) आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती आयोजक मधुकर शंकर जाधव व डि. एम. कुलकर्णी यांनी दिली. या पतसंस्थेमध्ये ठेवलेल्या ठेवींची ठेवीदारांनी अनेकदा मागणी करूनही रकमा मिळालेल्या नाहीत. त्या परत मिळवून देण्यासाठी परत एकवार रायसोनी पतसंस्था ठेवीदारांसाठी नव्याने जागर करण्यात येत आहे. त्यासाठी ही सभा दि. ६ रोजी सकाळी ११ वाजता बाळासाहेब देशपांडे (सिद्धीबाग) उद्यानात आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली. या पतसंस्थेतील ज्या ठेवीदारांना ठेव रकमा मिळालेल्या नाहीत, अशा जास्तीत जास्त ठेवीदारांनी आपल्याजवळील ठेवपावत्यांच्या झेरॉक्स प्रती घेऊन या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महात्मा फुले हे सर्व समाजाचे दैवत – बाळासाहेब मिसाळ

**महात्मा फुले व सावित्रीआई फुले यांचे स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी 'माळीवाडा वेस पाडावी' यासाठी वीरशैव लिंगायत गवळी समाजाचा जाहीर पाठिंबा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** दीडशे वर्षांपूर्वी क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले या दांपत्यांनी सर्व समाजाला शिक्षणाची द्वारे खुली केली. त्यांच्या कार्याला विरोध करणाऱ्यांनी वेळप्रसंगी शेण व चिखल मारले. तरीदेखील या महापुरुषांनी सर्वांना शिक्षण दिले.महिलांना चूल आणि मुल या सकल्पनेतून बाहेर काढले.शिक्षणाने महिलांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली.महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक होत असल्याने सर्व समाजाला आनंद होत आहे.माळीवाडा येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले पूर्णाकृती पुतळा होऊन भव्य दिव्य असे स्मारक व्हावे.ही सर्व समाजाची मागणी आहे.स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी माळीवाडा वेस पाडण्यात यावी.यासाठी वीरशैव लिंगायत गवळी समाज जाहीर पाठिंबा देत आहे.महात्मा फुले हे सर्व समाजाचे दैवत आहे.असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मिसाळ यांनी केले आहे.

महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीच्या ''माळीवाडा वेस पाडावी''या ठरावाला वीरशैव लिंगायत गवळी समाज ट्रस्ट ने जाहीर पाठिंबा दिला आहे.यावेळी महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीचे किशोर डागवाले,प्रा.माणिक विधाते,बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड यावेळी. वीरशैव लिंगायत गवळी समाज अहिल्यानगर चे नगरसेवक प्रकाश भागानगरे, सटवाजी आप्पा गेणाप्पा,पै.सतीश हरबा,विष्णूशेठ कलागते, चंद्रकांत औशीकर,आप्पासाहेब बारसे, शंकरराव पंगूडवाले, हरिभाऊ हिरणवाळे ,लंकेश हरबा,बाळासाहेब मिसाळ,दत्तात्रय नागापुरे,मोहन हिरणवाळे,राहुल हरबा,राजू घुगरे,अनिल हरबा,सचिन बहिरवाडे,नंदू भाऊ भागानगरे,जगन्नाथ बहिरवाडे, संभाजी नामदे,नवनाथ खंडेराव उमेश दहींडे,अरुण औशीकर, सागर हरबा,विशाल भागानगरे,बंडू लंगोटे,सोमनाथ शहापूरकर आदी उपस्थित होते.

यावेळी प्रा.माणिक विधाते म्हणाले,महात्मा फुले व सावित्रीआई फुले यांच्या स्मारकासाठी जागा अपुरी पडत असल्याने माळीवाडा वेस पाडण्यात यावी हा ठराव फुले दांपत्य स्मारक समितीने केला आहे. स्मारक पाचही रस्त्यावरून दिसावे.तसेच परिसरातील अतिक्रमणे काढण्यात यावी.रखडलेले स्मारकाचे काम ताबडतोब सुरू करावे या मागणीसाठी महानगरपालिकेत निवेदन देण्यात आले आहे.या मागणीला नगरसेवकांनी मोठा पाठिंबा दिला आहे.तसेच शहरातील गणेश मंडळे व अनेक समाजाचा पाठिंबा मिळत असल्याने महात्मा फुले अनुयायांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.शहरातील गवळी समाजाने मोठा पाठिंबा दिला आहे.

यावेळी अनिल हरबा यांनी आभार मानले.

## कायद्याचा अभ्यास करणाऱ्यासाठी मार्केट यार्ड येथे नवीन बॅच

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कायदा (लॉ) परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी येथील मार्केट यार्ड परिसरात रास्त दरात क्लासेस सुरू करण्यात आले आहेत. अल्पावधीत प्रशिक्षणार्थ्यांकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे आता येथेच नवी बॅच सुरू करण्यात येत आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारा नगरमधील हा एकमेव क्लास असल्याचे संचालक गजानन फुंदे यांनी सांगितले.

लॉ–सीईटी ॲण्ड क्लॅट या क्लासमध्ये लॉच्या विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले लॉजिकल रिझनिंग, जनरल नॉलेज, मुख्य कायद्याचे विषय तज्ज्ञ वकिलांकडून शिकवले जातात. याची अत्यंत उत्कृष्ट तयारी परीक्षा देणार्या विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते. त्यांना हा क्लास उज्ज्वल यशाची हमी देतो, अशी माहिती संचालक श्री. फुंदे यांनी दिली.

लॉ करताना नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही या क्लासने 'संडे बॅच' सुरू केलेली असून, असे विद्यार्थी रविवारी क्लास करून आपल्या परीक्षेची योग्य तयारी करू शकतात, असे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना वकिली पद्धतीने पॉईंट मांडणे, विषयाची खोली समजावून सांगणे तसेच वकिलीसाठी आवश्यक असलेले गुण शिकविण्यासाठी प्रयत्न केले जातात, असेही संचालक श्री. फुंदे यांनी सांगितले.

कायदा (लॉ) परीक्षेचा अभ्यास करणार्या विद्यार्थ्यांनी या क्लासमध्ये आपला प्रवेश निश्चित करून, वरील सर्व वैशिष्ट्यांसह आपली वकिलीची पदवी निश्चित करावी, असे आवाहन श्री. फुंदे यांनी शेवटी केले.

## महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी आशाताई गवळी यांच्या नियुक्तीची मागणी

**अखिल भारतीय सेनेचे निवेदन; सक्षम नेतृत्वाची गरज**
**महिलांच्या न्याय व सक्षमीकरणासाठी अनुभवी नेतृत्वाची अपेक्षा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी सौ. आशाताई अरुणभाऊ गवळी यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ वनारसे यांनी अप्पर जिल्हाधिकारी दळवी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व राज्यपाल यांना निवेदन पाठविले आहे. यावेळी रावसाहेब काळे पाटील उपस्थित होते.

अलिकडील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणानंतर तत्कालीन महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना राजीनामा द्यावा लागला असून, सध्या हे महत्त्वाचे पद रिक्त आहे. या पार्श्वभूमीवर महिलांच्या संरक्षण, न्याय आणि सक्षमीकरणासाठी सक्षम, निष्ठावान व अनुभवी नेतृत्वाची गरज अधिक तीव्रतेने जाणवत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सौ. आशाताई गवळी या अखिल भारतीय सेनेच्या सरचिटणीस पदावर कार्यरत असून, त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा दिला आहे. महिलांवरील अन्याय, अत्याचार व शोषणाविरोधात त्यांनी ठाम भूमिका घेतली असून अनेक पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रभावी पाठपुरावा केला आहे. याशिवाय, गरजू व होतकरू मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून त्यांना सक्षम बनविण्याचे कार्यही त्यांनी केले आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध रोजगाराभिमुख उपक्रम राबविणे, समाजातील दुर्बल घटकांमध्ये जागृती निर्माण करणे आणि महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव करून देणे, तसेच स्थानिक स्तरावर महिलांच्या सुरक्षेसाठी संघटनात्मक बळ उभे करण्याचे कार्य गवळी यांनी सातत्याने केले आहे.
आजच्या परिस्थितीत महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असताना त्यावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी आणि पीडितांना त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी महिला आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे या पदावर कर्तृत्ववान, निर्भीड आणि सामाजिक बांधिलकी असलेल्या व्यक्तीची नियुक्ती होणे अत्यावश्यक असल्याचे अखिल भारतीय सेनेने स्पष्ट केले आहे.

## धार्मिक उपक्रमातून संस्कारित पिढी घडते - आ. संग्राम जगताप

**धनगरवाडी येथे श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात**
**हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद व महाआरतीचा लाभ**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर–छत्रपती संभाजीनगर रोडवरील धनगरवाडी येथे श्री संकटमोचन हनुमान मंदिर व श्री संकटमोचन हनुमान सेवा ट्रस्टच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांना हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसाद व महाआरतीचा लाभ घेतला.

पहाटेच्या शुभमुहूर्तावर झालेला जन्मोत्सव सोहळा विशेष आकर्षणाचा ठरला. मंदिर परिसरात भजन, आरती व धार्मिक विधींच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर दुपारी आयोजित महाप्रसादासाठी तब्बल दहा ते पंधरा हजार भाविकांनी उपस्थिती लावली. सायंकाळी पार पडलेल्या महाआरतीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, मंगल भक्त सेवा मंडळाचे राजाभाऊ कोठारी, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संदीप कर्डिले यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी व अनेक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे हा उत्सव यंदा अकराव्या वर्षात पदार्पण करत असल्याने त्याचे औचित्य अधिकच वाढले होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यमातून जुन्या व पुरातन मंदिरांचा विकास करण्यात येत आहे. उपनगर व शहरालगत असलेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार भाविक आणि युवकांच्या पुढाकारातून होत असून, त्यामुळे भक्तांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होत आहेत. श्री संकटमोचन हनुमान सेवा ट्रस्टचे धार्मिक व अध्यात्मिक उपक्रम स्तुत्य असून, अशा उपक्रमांमुळे समाजात संस्कारित पिढी घडण्यास हातभार लागतो. धर्माशी जोडलेली पिढी देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच, संकटमोचन हनुमानजींच्या नावाने कार्यरत असलेले हे युवकांचे संघटन भविष्यातही संकट काळात समाजसेवेसाठी तत्पर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजाभाऊ कोठारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, भगवंताच्या कृपेने हे सेवा कार्य अखंडपणे सुरू आहे. एकनिष्ठता आणि समर्पणाच्या भावनेतून ट्रस्ट कार्यरत असून, धर्मासाठी युवकांच्या हातून घडणारी सेवा निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## ढवळपुरीतील रोजगार सेवकावर निधी अपहाराचा गंभीर आरोप

**रोहयो कामांमध्ये कुटुंबातील सदस्यांसह बोगस नावे टाकून लाखो रुपयांचा गैरव्यवहार?**
**अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचा उपोषणाचा इशारा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील मौजे ढवळपुरी येथे रोजगार हमी योजनेच्या (रोहयो) कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून, ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असलेल्या रोजगार सेवकाने बोगस मजुरांची नावे टाकून तसेच स्वतःच्या नावावरही रक्कम काढून शासकीय निधीचा अपहार केल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे.

समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी याबाबत प्रशासनाकडे तक्रार करत संबंधित रोजगार सेवकावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, येत्या १५ दिवसांत कारवाई न झाल्यास नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

ढवळपुरी हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून येथे रोहयो अंतर्गत विविध कामे सुरू आहेत. या कामांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या रोजगार सेवक घुमटकर यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ऑनलाईन हजेरी पत्रकांची तपासणी केल्यानंतर अनेक व्यक्ती प्रत्यक्ष कामावर नसतानाही त्यांच्या नावावर हजेरी दाखवून एटीएमद्वारे रक्कम काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये स्वतःचे नाव, कुटुंबातील सदस्यांची नावे तसेच इतर बोगस मजुरांची नावे टाकून निधी काढल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या आईचे नावही हजेरीत टाकण्यात आले असून त्या प्रत्यक्षात बाजारात भाजी विक्रीचे काम करत असल्याचे सांगण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, काही वयोवृद्ध व्यक्ती काम करण्याच्या स्थितीत नसतानाही त्यांच्या नावावर हजेरी दाखवण्यात आली आहे. तसेच, काही व्यक्ती रांजणगाव एमआयडीसी येथे नोकरी करत असतानाही त्यांची नावे रोहयोच्या कामांमध्ये दाखवून रक्कम काढण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याशिवाय, विहिरींसारख्या विविध कामांवरही मोठ्या प्रमाणात बोगस मजुरांची नावे टाकून निधी उचलण्यात आल्याचे आरोप करण्यात आले आहेत. घुमटकर यांच्या ताब्यात असलेल्या एटीएम कार्डच्या व्यवहारांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संपूर्ण मजुरांच्या नोंदींची तपासणी करून ज्या–ज्या ठिकाणी गैरव्यवहार झाला आहे, त्या सर्व रकमा संबंधितांकडून वसूल कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करावा, अन्यथा १५ दिवसांत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## फुले दांपत्य स्मारक समितीला माळीवाडा येथील गणेश मंडळांनी दिले पाठिंबा पत्र

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होऊन आठ महिने झाले तरीदेखील प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाली नाही.माळीवाडा परिसरातील अतिक्रमणे व माळीवाडा वेशी त स्मारकासाठी जागा अपुरी पडत असल्याने स्मारकाचे काम पूर्ण होऊ शकत नाही.हे फुले प्रेमींच्या लक्षात आल्याने फुले प्रेमींनी शहरातील गणेश मंडळे,विविध समाजाचे पदाधिकारी,सामाजिक संघटना व नगरसेवक यांच्या भेटीगाठी घेऊन स्मारक होणे किती महत्त्वाचे आहे.हे निदर्शनात आणून दिल्यानंतर शहरातील ६२ नगरसेवकांनी फुले दाम्पत स्मारक समितीला मोठा पाठिंबा देत महानगरपालिकेचे महापौर तसेच उपमहापौर यांना निवेदन देऊन माळीवाडा वेश पाडण्यासाठी महानगरपालिकेत विशेष सभा घेण्याची मागणी केली आहे.या सर्व नगरसेवकांचे अभिनंदन करतो.तसेच माळीवाडा परिसरातील दहा गणेश मंडळांनी पाठिंबा दिला आहे.याबरोबरच सकल मराठा समाज,सकल कैकाडी समाज, पद्मशाली समाज,साळी समाज, कासार समाज अशा अनेक समाज बांधवांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याने लवकरच महानगरपालिकेच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे काम पूर्ण होऊन भव्य दिव्य स्मारक होईल.असे प्रतिपादन महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीचे किशोर डागवाले यांनी सांगितले आहे.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या स्मारक होण्यासाठी तसेच परिसरातील अतिक्रमणे हटविणे व माळीवाडा वेस पाडावी.यासाठी फुले दांपत्य स्मारक समितीला माळीवाडा परिसरातील तरुण मंडळांनी पाठिंबा पत्र दिले आहे.यावेळी स्मारक समितीचे किशोर डागवाले,बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड, अमोल भांबरकर,राजेंद्र पडोळे,श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा.माणिक विधाते, पंडितराव खरपुडे,ज्ञानेश्वर रासकर,छगुनाना जाधव,बजरंग भुतारे,विष्णुपंत म्हस्के,संग्राम रासकर,अशोक आगरकर,राजेंद्र ताठे,प्रकाश इवळे,भास्कर चौधरी,सुरेश कावळे,जालिंदर बोरुडे ,सुधीर पुंड,गणेश कोल्हे ,मच्छिंद्र बनकर बाबासाहेब दळवी,माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर, दिनेश कापरे,नंदकुमार नेमाने, गणेश धाडगे,अमोल रासकर, रोहित पठारे, मळु गाडळकर,अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे, फुले ब्रिगेडचे अध्यक्ष दिपक खेडकर, रोहन डागवाले, अनिल घाडगे,सतीश रासने, ज्ञानदेव खराडे, सुहास पाथरकर, शशिकांत पवार,मयूर मैड आदींसह महात्मा फुले प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
प्रा.माणिक विधाते म्हणाले,पूर्वी माळीवाडा वेश ही शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखली जात होती.

## साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार २०२६

# ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील व साहित्यिक प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांना घोषित

### अंबाजोगाईच्या साधना सेवाभावी संस्थेचा उपक्रम

अंबाजोगाई थोर समाजसेवक बाबा आमटे आणि त्यांच्या कार्याला खंबीर साथ देणाऱ्या साधनाताई आमटे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी येथील साधना सेवाभावी संस्थेच्या वतीने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. साधनाताई आमटे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे (१९२६२०२६) औचित्य साधून २०२६ पासून साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार एका दांपत्याला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे अशी माहिती संस्थेचे सचिव दगडू लोमटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. या वर्षीचा पहिला पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ कवयित्री व लेखिका अनुराधा पाटील व ज्येष्ठ लेखक व मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील या दांपत्याला घोषित केला आहे.

बाबा व साधनाताई यांनी कुष्ठरोगी, अंध, अपंग, मूकबधिर, आदिवासी यांच्यासाठी महारोगी सेवा समिती स्थापन करून आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन, रोजगार उपलब्ध करून उत्तम व सन्मानाने, स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य खर्च केले. यासाठी समाज व शासन यांनी उत्तम सहकार्य केले. त्यातून वरोरा येथे आनंदवन, भामरागड येथे लोक बिरादरी प्रकल्प व नंतर अन्य प्रकल्प सुरू केले. या कार्यात त्यांना साहित्य, संगीत, नाटक चित्रपट कला व ललितकला क्षेत्रातील अनेकांनी आर्थिक, मानसिक बळ दिले. तिथल्या सर्व कुष्ठरोगी, पीडित नागरिक, युवक यांचे जीवनमान उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अनेक साहित्यिकांनी आनंदवनला भेट देऊन पुस्तके लिहिली, कलावंतांनी व संगीत गायक वादक यांनी आपली कला तिथे पेश केली. ललित क्षेत्रातील मान्यवरांनी आनंदवनात येवून अनेक उपक्रम व कार्यशाळा राबवल्या. बाबाताई व आनंदवन, हेमलकसा येथील कार्यावर अनेकांनी पुस्तके लिहिली. स्वतः बाबा उत्तम कवी, चित्रपट समीक्षक होते. त्याच्या व पुढच्या पिढीने केलेल्या कार्यावर, लघुपट व चित्रपट काढण्यात आले. आनंदवनात या वंचित लोकांची कला सादर करण्यासाठी 'स्वरानंदवन' संगीतमंच निर्माण केला. साधनाताईचे 'समिधा', बाबांचे 'ज्वाला आणि फुले' व इतर पुस्तके, डॉ.प्रकाश आमटे यांचे 'प्रकाश वाटा', डॉ. विकास आमटे यांचे :आनंदवन प्रयोगवन' असे इतर साहित्य प्रकाशित आहे. ही बाजू उजागर करण्यासाठी साहित्य, कला, संगीत व ललितकला या क्षेत्रातील एकाच क्षेत्रात अथवा यातील भिन्न क्षेत्रात कार्य करणाऱ्या एका दांपत्यास हा पुरस्कार देण्याचा निर्णय साधना सेवाभावी संस्थेच्या वतीने एकमुखाने घेण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप शाल, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र पुष्पहार व एक लक्ष रुपये असे आहे. पहिला पुरस्कार साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय लेखन व साहित्य क्षेत्रात प्रचार व प्रसार करण्यासाठी आपले योगदान देणाऱ्या मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ



कवयित्री व लेखिका अनुराधाताई पाटील व प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांना देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या विशेष बैठकीस संस्थेच्या अध्यक्ष डॉ. शुभदा लोहिया, सचिव दगडू लोमटे, कोषाध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे, सहसचिव प्रा. शैलेश जाधव, सदस्य अमर हबीब, प्रा. भगवान शिंदे, प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी, शशिकला घोडके, अविनाश मुडेगावकर, संतोष मोहिते, स्वीकृत सदस्य बालाजी सुतार, प्रा. डॉ. शैलजा बरूरे व गोरख शेंद्रे हे सर्व सदस्य उपस्थित होते.

**'अनुराधाताई पाटील'**

अनुराधाताई पाटील यांनी 'दिगंत', 'तरीही', 'दिवसेंदिवस', 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ', 'कदाचित अजूनही', 'आता वह्या सगळ्या बुडीत खाती' हे कवितासंग्रह, 'नवसाला पावली डॉक्टरीण' हा प्रौढ साक्षरांसाठी दीर्घ कथासंग्रह, व 'दरअसल', 'अनुराधा पाटील री टाळावीं मराठी कवितावां' राजस्थानी व 'हत्या केवल शब्द नही हैं' हे





हिंदी अनुवादित कविता संग्रह प्रकाशित आहेत. त्याच बरोबर उडिया कविता, हिंदी कथा व कवितांची मराठीतील भाषांतरे प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितांचे हिंदी, उर्दू, उडिया, पंजाबी, राजस्थानी, मल्याळम, बंगाली, जपानी, इंग्रजी या भाषेतील नियतकालिकेतून त्यांचे साहित्य अनुवादित होऊन प्रकाशित झाले आहे. त्यांच्या साहित्य कार्याला साहित्य अकादमी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मान्यताप्राप्त साहित्य संस्थांचे मानाचे २५ हून अधिक पुरस्कार मिळालेले आहेत. साहित्य अकादमी पुरस्कार निवड समितीच्या तज्ज्ञ परीक्षक, जैन फौउंडेशन पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्ष, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय (विविधभाषा) कवी संमेलन, चर्चा सत्रे, प्रतिष्ठेच्या केरळ साहित्य महोत्सव, जयपूर साहित्य महोत्सव, मुंबई साहित्य महोत्सवात मराठी भाषेच्या कवी म्हणून निवड झाली होती. विविध भाषिक संमेलनाच्या उद्घाटक, अनेक संमेलनात व आकाशवाणी दूरदर्शनवर मुलाखती झाल्या. शालेय अभ्यासक्रमात व अनेक विद्यापीठात मराठी अभ्यासक्रमात त्यांची अनेक पुस्तके लागलेली आहेत. त्यांच्या साहित्यावर तीन जणांनी पी. एचडी व तीन जणांनी एम. फील केले आहे. त्यांच्या साहित्यावर विद्यापीठात एक दिवसाचे चर्चा सत्र आयोजित केले गेले. मराठीतील प्रख्यात साहित्यिकांनी त्यांच्या साहित्याचे समीक्षण केले आहे. मराठवाडा साहित्य परिषद, , प्रतिष्ठान मासिकाचे संपादक मंडळ, साहित्य अकादमी महाराष्ट्र, राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, भारतीय भाषा परिषद कलकत्ता या संस्थांचे त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. महत्वाचे साहित्य अकादमी दिल्ली येथे पाच वर्षे सदस्य म्हणून उत्तम कार्य केले आहे.

**'प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील'**

कौतिकराव ठाले पाटील हे उत्तम प्रशासक, लेखक, संघटक, शिक्षणतज्ज्ञ म्हणून सुपरिचित आहेत. त्यांची 'संमेलनाच्या मांडवाखालून', 'मराठी भाषिक आणि साहित्य संकृती', हे ग्रंथ व 'वाचनवेध', 'शेतकऱ्याचा आसूड', व प्रतिष्ठानच्या अनेक विशेषांकाचे संपादन केले आहे. महात्मा गांधी मिशन, संभाजीनगर, व परळी, माहूर, येथील साहित्य सेवा पुरस्कारा बरोबरच महाराष्ट्र शासनाचा मंगेश पाडगावकर 'भाषा संवर्धन पुरस्कार' प्राप्त आहे.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे दोन वर्षा पेक्षा जास्त काळ प्रशासक म्हणून कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, भाषा मंडळाचे अध्यक्ष व कला शाखेचे अधिष्ठाता म्हणून कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ते कांहीं काळ हंगामी कुलगुरू म्हणून कार्यरत होते. मराठी भाषेच्या अध्यापनापासून सुरू झालेली मराठी साहित्याची सेवा ते आजही करीत आहेत.

मराठवाडा साहित्य परिषदेचे कांहीं काळ सचिव व २६ वर्षा पेक्षा अधिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले व करीत आहेत. अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ते तीन वर्षे सचिव व दोन वेळा ६ वर्ष अध्यक्ष म्हणून त्याची कारकिर्द गाजवली आहे. नॅशनल बुक ट्रस्ट दिल्लीचे भाषा सल्लागार व साहित्य अकादमी दिल्लीचे व महाराष्ट्र शासन साहित्य पुरस्कार समितीचे पाच वर्षे सदस्य म्हणून काम केले. राष्ट्रीय भाषा चर्चा सत्रातील त्यांचा सहभाग, कार्यशाळेतील त्यांची भाषणे दिशादर्शक ठरली आहेत. २००४ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे पारपडलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते कार्याध्यक्ष होते. हे संमेलन सर्वार्थाने मराठी साहित्यातील मूल्य संस्कृतीची श्रीमंती दर्शविणारे ठरले होते. विश्व मराठी साहित्य संमेलनाची कल्पना प्रथम त्यांनी मांडली. प्रचंड टीका व विरोधाला न डगमगता त्यांनी अमेरिका व दुबई येथे ही संमेलने घेतली. मराठवाडा साहित्य परिषदेचा विस्तार व प्रादेशिक संमेलने घेऊन महत्वपूर्ण कार्य केले आहे. या दोघांच्या साहित्य कार्याचा महत्त्वपूर्ण सहभाग व महत्व पाहता अनुराधाताई पाटील व कौतुकराव ठाले पाटील यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

या पुरस्कार निवडीसाठी अमर हबीब, डॉ. शैलजा बरुरे व बालाजी सुतार यांची निवड समिती नेमली होती. त्यात दगडू लोमटे व डॉ. शुभदा लोहिया यांनी संस्थेचे सदस्य म्हणून काम केले. दगडू लोमटे हे गेली ४० वर्षे आनंदवनाशी जोडलेले आहेत. त्यांनी बाबा आमटे यांच्या भारत जोडो अभियान १९८५८६ साली कन्याकुमारी ते काश्मीर सायकल यात्रा केली होती. बाबा आमटे यांची जन्मशताब्दी अंबाजोगाईत साजरी केली होती. त्यांनी बाबा व साधनाताई यांच्या प्रेरणेने सामाजिक, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात ते कार्यरत आहेत. दगडू लोमटे यांच्या कल्पनेतून हा पुरस्कार सुरू करावा असा प्रस्ताव मांडला. संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी तो मान्य केला. या पुरस्काराचा वितरण समारंभ, ठिकाण व तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे. अशीही माहिती त्यांनी दिली आहे.

# बँकेत भरणा करण्यासाठी दिलेल्या रकमेचा अपहार आरोपीचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मौजे शेंडी ता. जिल्हा अहिल्यानगर येथील जुबेर अन्वर खान याचा अटकपूर्व जामीन नामंजूर. याबाबतची सविस्तर हकीगत अशी, मुकेश कचरुलाल शिंगवी राहणार आगरकर मळा स्टेशन रोड अहिल्यानगर यांचे मार्केट यार्ड अहिल्यानगर येथील सजन प्लायवूड व हार्डवेअर विक्रीचे दुकान आहे. आरोपी जुबेर अन्वर खान हा त्या दुकानात गेले सहा महिन्यापासून नोकर म्हणून काम करत होता. फिर्यादी शिंगवी यांनी नोकर जुबेर खान याचे कडे १४/१/२०२६ रोजी रक्कम रुपये ३०००० (तीस हजार ) फिर्यादी यांच्या मर्चंट बँक शाखा मार्केट यार्ड अहमदनगर येथे भरणे कामी दिलेली होती. ती रक्कम त्याने मर्चंट बँकेत न भरता तो रक्कम घेऊन फरार झाला म्हणून दुकान चे मालक या नात्याने फिर्यादी शिंगवी यांनी त्याच दिवशी १४/१/२०२६रोजी कोतवाली पोलीस स्टेशनला तक्रार केली. फिर्यादीच्या तक्रारीचे अनुषंगाने कोतवाली पोलिसांनी आरोपी जुबेर खानचे विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६(४)अन्वये दिनांक २१/१/२०२६ रोजी गुन्हा दाखल केला .मात्र पोलिसांनी त्यास अटक न केल्याने सदर आरोपीने सत्र न्यायालय अहमदनगर येथे अटकपूर्व जामीन मिळण्याचा अर्ज केला असता माननीय न्यायालयाने मूळ फिर्यादी मुकेश कचरुलाल शिंगवे यांना नोटीस काढून न्यायालयात म्हणणे दाखल करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मूळ फिर्यादी यांनी ॲड. सुरेश लगड यांचे मार्फत आरोपीचे अटकपूर्वक जामीन अर्जास तीव्र हरकत घेतल्याने व गुन्ह्याचे गांभीर्य पाहून सत्र न्यायाधीश श्री के एस कुलकर्णी यांनी जुबेर अन्वर खान याचा आटकपुर्व जामीन नुकताच फेटाळला.मुळ फिर्यादीतर्फे ज्येष्ठविधीज्ञ व विशेष सरकारी वकील ॲड सुरेश लगड यांनी काम पाहिले.

(पान १ वरुन)

## सोलर केबल चोरणारे चार सराईत जेरबंद

करण्यासाठी नगरच्या दिशेने येणार आहे. त्यानुसार पथकाने तात्काळ शेंडी बायपास रोडलगत किनारा हॉटेलजवळ सापळा रचून संशयित दोन्ही वाहने थांबवून तपासणी केली असता संतोष अशोक जाधव, करण वैश्य भोसले, मनोज सुनील लिंभोरे व परमेश्वर वैश्य भोसले हे आढळून आले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांच्या ताब्यातून सात लाख रुपये किमतीचा महिंद्रा पिकअप, साठ हजार रुपये किमतीची दुचाकी व केबल, चार मोबाईल असा एकूण ९ लाख ९१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या आरोपींच्या अटकेने गंगापूर व येवला (जि. नाशिक) येथील अशाच प्रकारचे आणखी दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

## भैय्या गोरे, अक्षय कर्डिले यांचे लॉज एक वर्षासाठी बंद करण्याचे आदेश

व्यवसायाच्या जीवावर गबर झालेल्या लॉजमालकांना यामुळे जोरदार दणका बसला असून, अवैध व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहे. प्रशासनाकडून करण्यात आलेल्या या कारवाईचे ग्रामस्थांकडून स्वागत होत आहे.

## कर्करोग रुग्णांसाठी ठोस उपाययोजना करा

सरकारने प्रत्येक जिल्ह्यात डे-केअर कॅन्सर सेंटर सुरू करण्याची घोषणा केली असली, तरी ती प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयातील मुख्य कर्करोग उपचार केंद्राचा विस्तार करून प्रत्येक तालुक्यात उपकेंद्र सुरू करावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली. तसेच आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मिळणारी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत कर्करोगासारख्या गंभीर आजारासाठी अपुरी ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर कर्करोग रुग्णांसाठी स्वतंत्र 'कर्करोग सहायता निधी' निर्माण करावा आणि आर्थिक मदतीची मर्यादा वाढवावी, अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली. ''गरीब रुग्णांचा जीव घोषणांवर नव्हे, तर वेळेवर आणि परवडणाऱ्या उपचारांवर वाचतो. त्यामुळे सरकारने तातडीने ठोस निर्णय घेऊन ग्रामीण भागातील कर्करोग रुग्णांना दिलासा द्यावा,'' असे आवाहन खासदार लंके यांनी केले.

## प्रगतीचे व्हिजन असणे अत्यंत महत्त्वाचे – उपमहापौर धनंजय जाधव

अजित बोरा यांनी धनंजय जाधव यांना पुढील कामासाठी शुभेच्छा देतानाच जाधव हे नेहमी आमच्या शाळेच्या प्रत्येक उत्तम कार्यात पाठीशी असल्याचे सांगितले. त्यांचे हिंद सेवा मंडळाशी कौटुंबिक नाते असून शाळेसाठी, संस्थेसाठी संपूर्ण कुटुंब नेहमीच अग्रेसर असते हे आवर्जून सांगितले.

हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी आपल्या शुभेच्छा मध्ये धनंजय जाधव हे नगरमध्ये एक आदर्श नेतृत्व असल्याचे सांगून सर्वांना सामावून घेणार व्यक्तिमत्व आहे. त्यांचे नेहमीच हिंद सेवा मंडळाला सहकार्य असते असे आवर्जून सांगितले.

विविध ॲक्टिव्हिटी विद्यार्थ्यांनी कराव्यात यासाठी स्वतंत्र ॲक्टिव्हिटी हॉल, भव्य लायब्ररी आणि विद्यार्थी रमतील, खेळतील अशी जिम, विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विद्यालयात सुरू करणार असल्याचे मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करताना सांगितले.

यावेळी शालेय समिती सदस्य संजय मुदगल, ईश्वर बोरा, एडवोकेट दीपक शर्मा, सचिन चोपडा, ज्योतीताई कुलकर्णी, मुख्याध्यापक अशोक डोळसे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, शिक्षक प्रतिनिधी दीपक आरडे, सौ दिपाली लगड, शिक्षकेतर प्रतिनिधी गोवर्धन पांडुळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयात ५० विद्यार्थ्यांचा सक्षम एनसीसी ग्रुप, विविध कलागुणांना वाव देणारे भव्य कलादालन याचबरोबर विविध खेळात यश मिळविण्यात अग्रेसर असणारा क्रीडा विभाग विद्यालयात उत्तम काम करत असल्याचे पर्यवेक्षिका सौ नंदा कानिटकर यांनी आपल्या आभार प्रदर्शनात सांगितले. कार्यक्रमासाठी विनोद जोशी, संजय शेकडे, चंद्रशेखर वाघ, अमोल कदम, आनंद जोशी, सौ. निमा राहिंज, सौ वृषाली जोशी, सौ. क्रांती मुंदानकर, सौ. वाघमारे, भाऊसाहेब बडगे, मोठ्या संख्येने पालक सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## अंजली दमानिया रॉ एजंट आहेत का?

कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी काही सीडीआर समोर आणले असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह रुपाली चाकणकर आणि काही नेत्यांच्या खरातसोबत झालेल्या संवादाचे डिटेल्स त्यांनी दिले आहेत. त्यावर, संजय राऊत यांनीही प्रतिक्रिया दिली. अंजली दमानिया काय रॉ एजंट आहेत का? मुख्यमंत्री कार्यालयशिवाय एवढी गुप्त माहिती बाहेर येऊ शकत नाही. त्यामुळे फडणवीस यांच्या टार्गेटवर कोणीतरी आहेत का? असा सवाल संजय राऊत यांनी उपस्थित केला. बाह्य शक्तीकडून जेंव्हा धक्कादायक माहिती बाहेर काढली जाते, तेंव्हा स्वकीय सरकारच्या निशाण्यावर आहे, असेही राऊत यांनी म्हटले.

# नेवासा आगार: अध्यक्षपदी अमोल ससाणे यांची बिनविरोध निवड

### ससाणे यांची निवड होताच राष्ट्रीय कर्मचारी सेनेत कर्मचाऱ्यांचा प्रवेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** राष्ट्रीय कर्मचारी सेना संघटनेच्या नेवासा आगार कार्यकारिणी (२०२६-२७) च्या अध्यक्षपदी श्री. अमोल रवींद्र ससाणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, तसेच आमदार किरणजी पावसकर यांच्या नेतृत्वाखाली एसटी कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी आणि हितासाठी सदैव तत्पर राहण्याची ग्वाही नवनियुक्त अध्यक्ष अमोल ससाणे यांनी दिली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण'' हा वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा पवित्र मंत्र आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची लोकसेवेची झंझावाती कार्यपद्धती डोळ्यासमोर ठेवून, नेवासा आगारात 'राष्ट्रीय कर्मचारी सेने'ची सन २०२६-२७ ची नूतन कार्यकारिणी नुकतीच बिनविरोध निवडण्यात आली. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, आमदार विठ्ठलराव लंघे आणि संघटनेचे अध्यक्ष किरणजी पावसकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक कर्मचाऱ्यांनी संघटनेत जाहीर प्रवेश केला.

**भव्य सत्कार सोहळा आणि मार्गदर्शन**

या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद केंद्रीय पदाधिकारी तथा प्रादेशिक उपाध्यक्ष श्री. चंद्रशेखर रा. ढवळे पाटील यांनी भूषवले. राज्याचे सरचिटणीस व्यंकटराव बिराजदार, कार्याध्यक्ष पंकज वालावलकर आणि राज्य उपाध्यक्ष श्री. कार्तिक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी प्रादेशिक उपाध्यक्ष श्री. चंद्रशेखर ढवळे पाटील यांच्या खंबीर नेतृत्वाचा गौरव करण्यासाठी संघटना व कर्मचाऱ्यांच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. तसेच नूतन कार्यकारिणीत निवड झालेल्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

**नूतन कार्यकारिणी २०२६-२७ (नेवासा आगार)**

पद नियुक्त पदाधिकाऱ्याचे नाव – अध्यक्ष श्री. अमोल रवींद्र ससाणे, उपाध्यक्ष श्री. काशिनाथ जाधव, श्री. संजय बर्डे, सचिव श्री. विजय लक्ष्मण सोनवणे, सहसचिव श्री. बाबा खेडकर, कार्याध्यक्ष श्री. अनिल ननवरे, कोषाध्यक्ष श्री. गणेश वखरे, संघटक श्री. अंबादास नागरे, संघटक सचिव श्री. महादेव वारे, प्रसिद्धीप्रमुख श्री. शिवाजी वैरागर

**कर्मचारी हितासाठी संघटना सदैव तत्पर**

यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''आमदार किरणजी पावसकर यांच्या खंबीर नेतृत्वात, बाळासाहेबांची शिकवण आणि दिघे साहेबांची कार्यपद्धती अवलंबून आम्ही काम करत आहोत. एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक न्यायासाठी आणि हक्कासाठी राष्ट्रीय कर्मचारी सेना सदैव तत्पर राहील.'' या सोहळ्याला आगार प्रमुख श्री. प्रशांत होले आणि वाहतूक निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर मुरदारे यांनी उपस्थित राहून नूतन कार्यकारिणीशी कर्मचाऱ्यांच्या अडी-अडचणींवर सकारात्मक चर्चा केली. प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन देत त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला संघटनेचे पदाधिकारी आणि नेवासा आगारातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता 'जय महाराष्ट्र' च्या घोषणांनी करण्यात आली.